
# वृत्तविशेष



मुक्काम धुळे :

## ८ मार्च–मूक मोर्चा

८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या दिवशी धुळयातील ५०० हून अधिक महिलांनी तोंडावर काळया फिती बांधून मूक मोर्चा काढला. या मोर्चात पोलिसलाईन, शिवाजीनगर, देवपूर, जुन्या धुळयातील अनेक महिला सहभागी झाल्या होत्या. मोर्चाला नगरपट्टीपासून प्रारंभ झाला. गल्ली नं. ६, फुलवाला चौक इ. मार्गाने मोर्चा कलेक्टर कचेरीवर गेला व कलेक्टरांना शिष्टमंडळाने निवेदन दिले. शिष्टमंडळामध्ये विजया चौक, वेल्हाणेबाई, शामला पाटील, मालती मराठे, सुमन जाधव, गयाबाई घाडगे इ. चा समावेश होता. नुकत्याच धुळे जिल्ह्यात तीन बलात्कारांच्या घटना अनुक्रमे नरढाणा, कुंडाणे आणि देवपूर (धुळे) येथे झाल्या. देवपूरमध्ये तर तीन वर्षांच्या मुलीवर बलात्कार झाला. अशा अनेक केसेस धुळे जिल्ह्यात आहेत. त्या सर्व केसेसची चौकशी करण्याची मागणी मोर्चाद्वारा करण्यात आली. तसेच पुढील मागण्या करण्यात आल्या–

(१) धुळे जिल्ह्यातील बलात्कार व अत्याचाराच्या पेंडिंग पडलेल्या सर्व केसेसची चौकशी व्हावी.

(२) हे सर्व करताना परिस्थितीजन्य पुरावा ग्राह्य धरावा.

(३) ज्या पोलिस अधिकाऱ्यांनी केसेस दडपल्या असतील व योग्य कलमाखाली नोंदवल्या नसतील त्यांना त्वरित निलंबित करण्यात यावे.

(४) ज्या डॉक्टरांनी मेडिकल रिपोर्टमध्ये फेरबदल केले त्यांना निलंबित करण्यात यावे.

(५) प्रत्येक खेड्यात एक पोलीस चौकी व एक स्त्री-पोलीस नेमावी.

(६) आरोपीला जामिनावर सोडू नये (७) बलात्कार केसेससाठी वेगळे कोर्ट असावे.

याचबरोबर दोंडाईचे येथील निर्मला भ्र. रमेश रनाळकर या बाईंच्या मृत्यूच्या चौकशीची मागणी करण्यात आली.

## १२ मार्च–पाणा मोर्चा

१२ मार्चला समाजवादी महिला सभेच्या पुढाकाराने ५०० स्त्रियांचा एक घागर मोर्चा धुळे नगरपालिका कार्यालयावर नेण्यात आला. सध्या धुळयाला पांझराकान आणि डेडेरगाव टाक्यांतून पाण्याचा पुरवठा होतो. पण पाण्याच्या टाक्या अपुऱ्या आहेत पाण्यातून जंतू बाहेर येतात. शिवाय सुखवस्तु कुटुंबात नळाला अर्ध्या हॉर्स-पॉवरच्या मोटारी लावल्या जातात. त्यामुळे तिकडे नळाला पाणी जास्त येते व इतर भागात येत नाही. शिवाय पाण्यासंबंधी इतर प्रश्न आहेतच. त्यामुळे १२ मार्चला घागरमोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये पाणीपट्टी कमी करा, पाण्यासाठी दारोदार आम्हा फिरविसी प्रशासका, इ. घोषणा भगिनी देत होत्या. पुढील मागण्या करण्यात आल्या–(१) जास्त प्रमाणात पाणी पुरवावे. (२) एस.आर.पी. कॉलनीत पाण्याची सोय करावी. (३) अर्धवट पाईप लाईन पुऱ्या कराव्यात, (४) हॉर्स-पॉवर पंप बसविणाऱ्यांवर खटले भरावेत. (५) पाणीपट्टी कमी करा.

या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी प्रशासकांना एक एप्रिल मुदत देण्यात आली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचे समाजवादी महिला सभेने ठरविले आहे. १९७५ पासून दरवर्षी पाण्याचा मोर्चा काढावा लागतो असे माजी नगरसेविका विजयाताई चौक यांनी सांगितले.

–लता

## हुंडाविरोधी पोस्टर स्पर्धा

स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया (एस्. एफ्. आय.) धुळे जिल्हा युनिटची नुकतीच स्थापना झाली आहे. युनिटतर्फे नुकताच क्रांतिवीर शहीद भगतसिंग सप्ताह पाळण्यात आला. या सप्ताहाचा एक भाग म्हणून हुंडाविरोधी पोस्टर्सची एक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. धुळे भागामध्ये हुंड्याचे प्रमाण फार आहे व युवक-युवतींमध्ये ही नाराजी आहे. या पोस्टर्स स्पर्धेमध्ये मुली व मुलांनीही भाग घेतला होता. या स्पर्धा शिरपूर येथे झाल्या. हा कार्यक्रम आयोजित करण्यात लता गुजराती, हर्षा ब्रह्मभट्ट, उर्मिला लाड इत्यादींनी पुढाकार घेतला होता.

**—लता**

## युक्रांदतर्फे महिला-चर्चा सत्र संपन्न

मार्चच्या जागतिक महिला दिनी युक्रांदच्या लातूर युनिटच्या वतीने महिला चर्चासत्राचा कार्यक्रम महिला मंडळ, लातूर, या ठिकाणी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रामुख्याने चित्रांच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न, त्यांची अनिष्ट प्रथांद्वारे होणारी गळचेपी, वगैरेंचे प्रदर्शन सुनील बडूरकरांनी मांडले होते. हे प्रदर्शन अत्यंत बोलके व प्रभावी ठरले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युनिटचे कार्यवाह शिवाजी कालेंनी केले.

या चर्चासत्रात "महिलांचे ज्वलंत प्रश्न, अडचणी व त्यावरील उपाय" यावर सविस्तर चर्चा होऊन खालील ठराव मांडण्यात आले व मंजूर करण्यात आले—

(१) स्त्री-पुरुषांना समान वेतन मिळावे.

(२) विहिरीवर व हापश्यावर टाकी बांधून पाणी-पुरवठा करावा.

(३) नवऱ्याने घरकामात मदत करावी.

(४) महारोगी वस्तीवरील स्त्रियांसाठी संडास बांधून द्यावे.

(५) दारू पिणाऱ्या नवऱ्याचा बंदोबस्त करावा. इत्यादी.

या कार्यक्रमास महाराष्ट्र युक्रांदचे सहकार्यवाह संदिपान बडगिरे, कमल कांबळे, निशा हातिसकर, सौ. अंबुरे व इतर अनेक महिला व बहुसंख्येने पुरुष हजर होते. कार्यक्रमाचे संचलन व समारोप त्र्यंबक कोचेवाड यांनी केला.

**—त्र्यंबक कोचेवाड**

(पान ३१ वरून चालू)

## गेट आऊट

माझ्या हातात पदव्या आहेत
एक 'बी.ए.'ची दुसरी 'एम.ए.'ची
तिसरी एम.एड.ची, चौथी पी.एचडी.ची
अन पदव्यांची फाईल घेऊन रोज...
ऑफिसात चकरा मारतोय
साहेब मला नोकरी मिळेल काय...?

कोणतीही. अन कशाचीही
दहा रुपयांपासून शंभरापर्यंतची
पण तीचं नाव पाहिजे नोकरी
तरच मला मिळेल एखादी 'छोकरी'
साहेब माझा 'इंट्रेव्यू' घेतात
तुमचं नाव...काय...?

माझ खर नाव 'विद्याधर'
पण एवढी विद्या शिकल्यापासून
आता लोक म्हणतात 'पदवीधर'
पण इथे एकच जागा शिल्लक आहे.
तीही एका मास्तरची

तीही चालेल साहेब
मग डी. एड. होऊन अर्ज करा
दुसरी एक 'राखीव' आहे.
ती ही एका बालवाडीची
पण...मॉन्टेसरी काढून अर्ज द्या...
मग ह्या एवढ्या पदव्या हो साहेब...?

साहेब मला सल्ला देतात.
काचेत फ्रेम करून बैठकीत लावा.
बैठक नसेल तर...
फाईल करून जपून ठेवा.
अन् तेही जमत नसेल तर...
एका रद्दीच्या दुकानात विकून टाका.
बघता काय...? गेट...आऊट...
गेट...आऊट...

उत्तमराव तु. मधळ